CMYK

राष्ट्रीय महामार्ग नव्हे हा तर मृत्यूचा महामार्ग >> पान 2

मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे सोयाबीन पाण्यात >> पान 3

निसर्गाच्या लहरीपणामुळे पुन्हा एकदा शेतकरी अडचणीत >> पान 4

**सुविचार**

प्रतिकूलतेतही अनुकूलता निर्माण करतो तोच खरा माणूस !


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




जान्हवी कपूरसाठी देवरा हिट होणे गरजेचे

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 51 ■ शुक्रवार, दि. 27 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# महावितरणच्या भोंगळ कारभाराने नागरिकांचा जीव धोक्यात

## महावितरणच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पडला कर्तव्याचा विसर : वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत, मेहकर विधानसभा मतदार संघातील व जवळपास ३२ गावांची महत्वाची बाजारपेठ अशी ओळख असलेल्या डोणगावमध्ये मात्र समस्यांचा डोंगर उभा आहे. तर भरीत भर म्हणून महावितरणच्या भोंगळ कारभाराने तर नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. डोणगावमधील अनेक विद्युत रोहित्रांचे फेजबॉक्स हे उघडे असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. याकडे महावितरणच्या अधिकारी व कर्मचार्यांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन डोणगावमधील उघडे रोहित्रांचे फेसबॉक्स नव्याने बसवावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मेहकर विधानसभा मतदार संघातील डोणगाव हे ३२ गावांची मुख्य बाजारपेठ आहे. तर डोणगाव हे नेहमीच शासकीय अधिकारी व कर्मचर्यांच्या उदासीन धोरणामुळे या ना त्या कारणाने चर्चेत राहते. आता तर महावितरण कंपनीने दुर्लक्षीतपणाचा कळस गाठला असून येथे अजब गजब कारभार पहायला मिळत आहे. डोणगाव येथे ३३ केव्ही चे महावितर कंपनीचे उपकेंद्र आहे. नागरिकांना सुविधा मिळावी, यासाठी कोट्यवधींचा खर्च करून या ठिकाणी उपकेंद्र उभारले आहे. तर यावर महिल्याला लाखो रुपये खर्च करून अधिकारी व कर्मचार्यांची नियुक्ती केली आहे. मात्र, अधिकारी व कर्मचार्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडल्याने डोणगावमध्ये विद्युत संदर्भात अनेक समस्या दिवसेन दिवस वाढत आहेत. केवळ पगार घेत वेळ मारून नेली जात असून याचा त्रास मात्र सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे.

येथील राष्ट्रीय महामार्गाजवळील त्रिगुणी चौक परिसर हा वर्दळीचा असताना येथील विद्युत रोहित्र हे पूर्णतः जळालेले असून ते जमिनीपासून लहान मुले व गुरुचा सुद्धा सहज स्पर्श होईल अश्या उंचीवर आहे. विशेष म्हणजे याठिकाणी लहान मुलेसुद्धा खेळतात. त्यामुळे या रोहित्रामुळे व उघड्या फेजबॉक्समुळे अनुचित प्रकार घडण्याची भिती स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. अनुचित प्रकार घडल्यास याला जबादार कोण असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. तसेच झालेली हानी ही पैशांनी सुद्धा भरून निघणारी नाही, त्यामुळे वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन येथील कामचुकार अधिकारी व कर्मचार्यांना सदर रोहित्रांची दुरुस्ती करून ते सुरक्षीत करावे तसेच रोहित्राच्या उघड्या फेजबॉक्सला नवीन बॉक्स लावून लॉक लावावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.





### डोणगावमध्ये समस्या पाचवीलाच

डोणगाव हे मोठे गाव असून मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे या ठिकाणी दरदिवशी लाखो रुपयांचा व्यवहार होतो. तसेच अनेक छोटेमोठे व्यवसाय आहेत. आर्थिक, वैद्यकीय अशा अनेक सुविधांसाठी विद्युत पुरवठा सुरळीत राहणे आवश्यक आहे. मात्र विद्युत वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचार्यांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने येथील विद्युत समस्या ही पाचविलाच पुंजलेली असल्याचा प्रतिक्रिया ग्राहकांकडून उमटत आहेत. तर याकडे वरिष्ठ अधिकार्यांसह पदाधिकार्यांनी लक्ष देऊन विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याबरोबच रोहित्रांपासून नागरिकांची सुरक्षा करण्यासाठी उपाययोजना कराव्या,अशी मागणी होत आहे.

**–दत्तात्रय पळसकर नागरिक डोणगाव**

रस्त्यावर असलेल्या रोहितच्या फेजबॉक्स हे उघड्यावर असल्यामुळे मुलांचे हात पुरतील अशा अंतरावर असल्यामुळे लहान मुलांच्या जीवाला खूप मोठा धोका निर्माण झाला आहे व गावातील मोकाट जनावरे सुद्धा यांना खेटतात त्यामुळे इदा कदाचित दुर्दैवी घटना घडली तर याला जबाबदार सहाय्यक अभियंता सह महावितरणचे कर्मचारी असतील.

**–अमोल सुभाष पळसकर**
**गावकरी**

## बनावट दस्तावेजाने आदेश पारित: संजय लक्ष्मण चंदन

**दैनिक आपला विदर्भ**

■ **अयाज काजी**

**दिग्रस** : दिग्रस नगरपरिषद येथील तत्कालीन मुख्याधिकारी तथा बांधकाम विभागाचे अभियंता व लेआउट व्यावसायिक प्रभाकर नारायण बुकिनपल्लेवार यांनी अर्जदाराच्या नावाने असलेल्या मिळकती संबंधाने खोटे व बनावट दस्तावेज आदेश तयार करून संजय चंदन यांची फसवणूक केल्याचे आरोप अर्जात केले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २३/९/२०२४ पासून संजय लक्ष्मण चंदन हे आमरण उपोषणाला बसले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की वारंवार संबंधित विभागाला अर्ज करून विनवण्या केल्या तरी सुद्धा माझ्या अर्जाचा विचार करण्यात आला नाही त्यामुळे मला नाईलाजाने आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला. लेआउट व्यावसायिक प्रभाकर नारायण बोंनकीनपल्लेवार यांनी अर्जदाराला धमक्या दिल्या आहे असे त्यांनी अर्जात नमूद केले आहे. संबंधित कार्यालयाने माझ्या प्रकरणात कोणतीच दखल न घेतल्याने मला शारीरिक आर्थिक मानसिक सर्व प्रकारचा त्रास झाला असून संबंधितावर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे असे त्यांनी अर्जदार नमूद केले आहे. दिग्रस शहरासह तालुक्यात अनेक प्रकारचे लेआउट धारक लेआउट मध्ये कोणत्याही प्रकारचे सोयी सुविधा उपलब्ध न करता विक्री करीत असल्याचे समजते.




# विधानसभेच्या तयारीला लागा

## केंद्रीय निवडणूक आयोग महाराष्ट्र दौऱ्यावर

### राजकीय पक्षांच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबतही होणार बैठक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : केंद्रीय निवडणूक आयोग शुक्रवारपासून (दि.२६) दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकांच्या तयारीसाठी केंद्रीय निवडणूक आयोग महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहे. दोन दिवस महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील बैठकांचा आढावा घेऊन निवडणूक संदर्भात चर्चा करणार असल्याची माहिती आहे. निवडणूक आयोग आणि सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची उद्या सकाळी दहा वाजता बैठक होईल. या बैठकीत निवडणुकांच्या संदर्भात चर्चा केली जाईल.

त्यानंतर १ वाजता मुख्य निवडणूक अधिकारी आणि इतर अधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेता जाईल. दुपारी तीन वाजता निवडणुकांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व विभागांशी बैठक घेऊन आढावा घेतला जाईल.

राज्याचे पोलीस महासंचालक,मुख्य सचिव आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्यासोबत सायंकाळी पाच वाजता बैठक घेऊन आढावा घेतला जाईल आणि त्यांना काही सूचना दिल्या जातील. शनिवारी इतर अधिकाऱ्यांशी चर्चा करून पत्रकार परिषद घेतली जाईल. काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आचारसंहितेबाबत भाष्य केले होते. त्यानंतर आता निवडणूक आयोग महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक दोन किंवा तीन टप्प्यात घेतली जाईल, अशा चर्चा सुरु आहेत. महाराष्ट्राची निवडणूक किती टप्प्यात होणार? हे शनिवारी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेतल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांमध्ये तगडी फाईट होणार असल्याचे बोलले जात आहे. कारण महायुतीतील तीन पक्ष आणि महाविकास आघाडीतील ३ पक्ष आमने-सामने असणार आहेत. शिवाय, शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडल्याने अनेक विधानसभा मतदारसंघातील प्रतिस्पर्धी एकाच आघाडीत आहेत. त्यामुळे अनेक पक्षांमध्ये बंडखोर उभे राहण्याची शक्यता आहे. इतकेच नाही तर मतदारांसमोर बच्चू कडू, राजू शेट्टी आणि संभाजीराजे छत्रपती यांच्या तिसऱ्या आघाडीचा पर्यायही असणार आहे. तिसऱ्या आघाडीच्या नेत्यांकडून मनोज जरांगे पाटील यांना सोबत घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. शिवाय, मनोज जरांगे पाटील कोणता निर्णय घेणार याकडे हे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले आहे.




## भंडारा येथे भ्रष्टाचारी कंत्राटदार, अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे आंदोलन




**दैनिक आपला विदर्भ**

**भंडारा/प्रतिनिधी** :शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे भंडारा शहरातील नगर परिषद अंतर्गत ई-लायब्ररी, रस्त्यावरील खड्डे, खांबतलाव येथील सौंदर्याकरणाच्या नावाखाली होत असलेल्या कामामध्ये तसेच छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल मध्ये दुरुस्ती व नुतनीकरणाच्या नावाखाली झालेल्या कामामध्ये प्रचंड मोठा भ्रष्टाचारा संदर्भात राज्य शासनाला, जिल्हा प्रशासनाला अनेकदा निवेदने देण्यात आली. परंतु प्रशासनातर्फे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे झालेल्या कामातील भ्रष्टाचारी कंत्राटदारावर, अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी याकरिता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे आज भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले आहे. तत्पूर्वी शिवसेने ठाकरे गटातर्फे भंडारा शहरातील राजीव गांधी चौक - मुस्लीम लायब्ररी चौक पोस्ट ऑफिस चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गाने मोर्चा काढण्यात आला आहे.

# पशु दवाखान्याला कुलूप : लंपीच्या आजारात वाढ

### सावरगाव येथील चित्र : अनेक पशु दगावले

**दैनिक आपला विदर्भ**

■ **नासीर शेख**

**पातूर** : पातूर तालुक्याच्या अतिदुर्गम भागातील सावरगाव येथील गेल्या आठ महिन्यापासून पशु दवाखान्याला कुलूप असल्याने इमारत शोभेची वस्तू बनली आहे.

त्यामुळे गेल्या काही दिवसापासून जनावरांमध्ये लंपीच्या आजाराचे प्रमाण वाढले असून, पशु पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. लंपीच्या आजारावर वेळेवर उपचार होत नसल्याने अनेक पशुपालकांचे पशु दगावल्याच्या घटना घडल्या आहे. याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. जनावरांना लंपी प्रतिबंधक लसीकरण करणे गरजेचे आहे. परंतु चक्क आठ महिन्यापासून पशु दवाखानाच बंद असून, अद्यापही डॉक्टर फिरकत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पशुपालकांना खाजगी लंपी आजारावर खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.असा आरोप सावरगाव येथील पशुपालकाकडून होत आहे. सावरगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्यावर कायमस्वरूपी उपचार व्यवस्था व डॉक्टर देण्याची मागणी पशुपालकाकडून वारंवार करण्यात आली परंतु संबंधिता कडून अद्यापही दखल घेण्यात आली नाही,त्यामुळे जनावरांचे मृत्यूचे सत्र सुरू आहे. याकडे संबंधित वरिष्ठांनी दखल घेण्याची गरज आहे.





### लंपीच्या आजारात वाढ : संबंधितांचे दुर्लक्ष

गेल्या अनेक दिवसापासून लंपी सारख्या संसर्गजन्य रोगाने पशुधनावर थैमान घातले असून, पशु दवाखान्याला आठ महिन्यापासून कुलूप असल्याने उपचाराअभावी अनेक पशुधन जनावरांचे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहे.याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याचे लक्ष होत असल्याचे आरोप होत आहे.

सावरगाव येथील पशु दवाखाना गेल्या आठ महिन्यापासून बंद आहे.त्यामुळे लंपिच्या आजारात वाढ झाली असून,काही जनावरे दगावले आहे.त्वरित जनावरांचे लसीकरणासाठी व कायमस्वरूपी स्थायी डॉक्टर देण्यात यावा.

**–मनोज बलक**
**पशुपालक सावरगाव**

CMYK

## 'गुगल' गुरु चा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे. अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्र्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# राष्ट्रीय महामार्ग नव्हे हा तर मृत्यूचा महामार्ग

## ■ डोणगाव मालेगाव महामार्गावर जागोजागी खड्डे
## ■ वाहनधारक त्रस्त, संबंधीत विभागाप्रती प्रचंड रोष

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** मेहकर मालेगाव हा राष्ट्रीय महामार्ग असून या महामार्गावर २४ तास प्रचंड वाहतुकीची वर्दळ राहते. राष्ट्रीय महामार्ग असतानाही या महामार्गावर जागोजागी प्रचंड मोठे खड्डे पडल्याने हा राष्ट्रीय महामार्ग की पाणंद रस्ता असा प्रश्र्न निर्माण वाहनधारक उपस्थित करीत आहेत. या महामार्गावरील खड्डे बुजवण्याची तसदी संबंधित अधिकारी घेत नसल्याने वाहनधारकांमध्ये मात्र प्रचंड रोष व्यक्त केला जात असून याकडे वरिष्ठ अधिकारी व केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लक्ष देऊन सदर महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे आदेश द्यावे, अशी अपेक्षा वाहनधारकांकडून व्यक्त होत आहे.

मेहकर ते मालेगाव या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळाल्यानंतर दोन वर्षांपूर्वी तब्बल २० कोटीचा निधी खर्च करूनही काम करण्यात आले आहे. मात्र अवघ्या दोन वर्षात या राष्ट्रीय महामार्गाला खड्ड्याने ग्रासले आहे. महामार्गाची अवस्था ही अत्यंत दयनीय झाली असून याकडे संबंधीत विभागाच्या अधिकार्यांचे व वरिष्ठांचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. रस्त्यावर अपघाताचे प्रमाण प्रचंड वाढल्याने नागरिकही




नागरिकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकी धारकांना तारेवर कसरत करून वाहन चालवावी लागत आहेत.तर या खड्ड्यामुळे दरदिवशी अपघाताचे प्रमाण वाढत आहे. महामार्गावर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी वारंवार मागणी करूनही याकडे संबंधीत विभागाचे मात्र दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे.

डोणगाव हे वाशिम, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असल्याने या ठिकाणाहून अकोला, वाशिम, जालना, छत्रपती शिवाजी नगर आदी ठिकाणी जाण्यासाठी २४ तास वाहनधारकांची वर्दळ असते. पावसाळ्यात पडलेले खड्डे आता दिवसेंदिवस वाढत असून सदर खड्डे हे दोन ते तीन फूट रुंद झाले आहेत. तर एक फुटाच्या जवळपास खोल झालेले आहेत. या रस्त्याच्या दुरुस्तीकडे मात्र राष्ट्रीय महामार्ग विभागाचे दुर्लक्ष असल्याने

### २० कोटी रूपयांच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

मेहकर ते मालेगाव या राष्ट्रीय महामार्गाच्या महामार्गासाठी तब्बल २० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. या २० कोटी रुपयांच्या निधीतून मेहकर ते मालेगाव या राष्ट्रीय महामार्गाचे काम करण्यात आले. त्यावेळेस अधिकारी व लोकप्रतिनिधीकडून मिळालेल्या माहिती आधारे मेहकर ते मालेगाव या रोडवर खड्डे बुजून थ्री लियर टाकण्यात येणार असल्याची समजले होते. यासाठी २० कोटी रुपयांचा निधीतून कामही करण्यात आले. मात्र २०२२ ते २०२४ पर्यंतच्या अवघ्या २ वर्षाच्या कालावधीत या रस्त्याची पुरती वाट लागली असून महामार्गावर जागोजागी खड्डे पडले आहेत. त्यामुळे २० कोटी रुपयांचा निधी खर्च करून करण्यात आलेल्या कामाच्या दर्जावर मात्र प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकाराकडे मात्र वरिष्ठ अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष झाल्याने हा सर्व मनमानी कारभार सुरू असल्याचे बोलले जात आहे.

### खड्डे बुजवण्यासाठी सामाजिक संघटनांचे आंदोलन

राष्ट्रीय महामार्ग असलेल्या मेहकर ते मालेगाव या मार्गावर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राष्ट्रीय महामार्ग महामार्ग प्राधिकरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढत तीव्र संताप व्यक्त केला होता. तर खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात जखमींना प्राथमिक उपचाराचा खर्च हा अधिकाऱ्याकडून वसूल करण्याची मागणी सुद्धा त्यांनी केली होती. तर या मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी अनेक संघटनाने पुढाकार घेत रास्तारोको आंदोलन केले होते. हा सर्व खटाटोप झाल्यानंतर मेहकर ते मालेगाव या राष्ट्रीय महामार्गाची परिस्थिती मात्र जैसे तेच आहे. त्यामुळे या महामार्गावरील खड्डे बुजवल्या जाणार की नाहीत असा प्रश्र्न निर्माण होतो असून खड्डे बुजवण्यासाठी पुन्हा आंदोलन करण्याची वेळ नागरिकावर येते की काय अशी चर्चा होत आहे.

मेहकर ते मालेगाव या राष्ट्रीय महामार्गावर खड्ड्यामुळे दर दिवशी दुचाकी धारक तसेच इतर मोठ्या वाहनांच्या अपघात घडत आहेत. या महामार्गावर डोणगाव डोणगाव नजीक वाटिका हॉटेल समोर प्रचंड मोठा खड्डा निर्माण झाल्याने या खड्ड्यात दुचाकी वाहनाबरोबर इतर चार चाकी वाहनाचे सुद्धा अपघात घडले आहेत. नुकताच या खड्ड्यात दुचाकीचा अपघात होऊन दुचाकीधारक गंभीर जखमी झाला होता. तसेच गाडीचे सुद्धा मोठे नुकसान झाले होते. दर दिवशी अपघात घडत असताना याकडे मात्र अधिकाऱ्यांचा प्रचंड दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे वाहनधारकासह नागरिकांमध्ये संबंधित विभागाच्या अधिकारी व लोकप्रतिनिधी बद्दल तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित विभागाच्या वरिष्ठ विभागाने व पदाधिकाऱ्यांनी लक्ष देऊन सदर खड्डे तत्काळ बुजवण्याचे आदेश संबंधित विभागाला द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बांधकाम कामगारांच्या विविध मागण्यासाठी आंदोलन

## कामगार नेते गणेश राठोड यांच्या नेतृत्वाखाली ११ ऑक्टोबर ला आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** बांधकाम कामगारांच्या विविध मागण्यांसाठी बांधकाम कामगार नेते गणेश राठोड यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालयावर अधिकार दो आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे या आंदोलनातील या आहेत प्रमुख मागण्या बांधकाम कामगार योजनेच्या अर्जावर ग्रामीण भागात ग्रामसेवक व शहरी भागात नगर अभियंता यांच्यासह्या आवश्यक केल्या आहे तरी तो अधिकार सरपंच, सदस्य,पोलीस पाटील तलाठी या सर्वांना द्यावा. ग्राम सेवक व नगर अभियंता यांनी सह्यादेणे बंद केले आहे त्या मुळे सर्व कामगार व मजुरांना त्रास होत आहे तरी ते त्वरीत चालु करावे. इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत बांधकाम कामगाराच्या पाल्यानां मिळणारा २५०० लाभ वाढवून ५००० करावा. व ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना मिळणारा ५००० लाभ ७५०० करावा. बांधकाम कामगारांना मिळणाऱ्या अटल आवास योजना शहरी व ग्रामिण भागात त्वरीत चालु करावी व या मध्ये असणारा २ लाखाचा लाभ ४.५० लाख करावा.प्रत्येक लाभार्थीस अत्याआवश्यक संच व सुरक्षा संच (पेटी) व किचन सट वाटप गाव पातळीवर चालु करावे. बांधकाम कामगारांच्या मृत्यु नंतर त्यांच्या वारसास मिळणाऱ्या लाभा करीता कामगारांच्या वयाची अट रद करावी.,बांधकाम कामगारांच्या मुलांना मिळणारे शैक्षणिक लाभ व इतर लाभाच्या कागद पत्राची पळताळणी महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका स्तरावर व्हावी. इंजिनीअर व डॉक्टर यांना देण्यात येणार्या शिष्यवृत्तीच्या अटी शिथील कराव्या यासह इतर मागण्या घेऊन ११आक्टोंबर रोजी अधिकार दो आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तालुक्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी आपले सदस्य पावती व निवेदन घेऊन आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन गणेश राठोड यांच्या कडून करण्यात आले आहे. तालुक्यातील दारव्हा ,चिखली,मांगकिन्ही,लाडख`ड, बोरी,लोही,महागाव क. या महसूल मंडळात समस्या स्विकारण्यासाठी संपर्क दौरा सुद्धा आयोजित करण्यात आले आहे.

## जान्हवी कपूरसाठी देवरा हिट होणे गरजेचे, अन्यथा ती गमावू शकते अनेक मोठे प्रोजेक्ट

२०१८ साली जान्हवी कपूरने मोठ्या पडद्यावर पाऊल ठेवले. 'धडक' या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. काळाच्या ओघात जान्हवी कपूरने खूप मेहनत घेतली आणि ती मेहनत तिच्या कामातही स्पष्टपणे दिसून आली. सध्या जान्हवी कपूर तिच्या साऊथ सिनेसृष्टीत पदार्पणासाठी चर्चेत आहे. जान्हवी कपूर ज्युनियर एनटीआरच्या 'देवरा पार्ट १' या चित्रपटातून तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. चित्रपटाची स्टारकास्ट सध्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. जान्हवी कपूरही सोशल मीडियाच्या माध्यमातून 'देवरा'चे भरपूर प्रमोशन करताना दिसत आहे. पाहिले तर जान्हवीसाठी 'देवरा' हिट होणे खूप महत्त्वाचे आहे. हा चित्रपट चालला नाही, तर जान्हवीला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते.

'देवरा'मध्ये जान्हवी कपूरची भूमिका चांगली असल्याचे मानले जाते. म्हणजेच अभिनेत्रीला चित्रपटात योग्य स्क्रीन स्पेस मिळाली आहे. अशा परिस्थितीत जान्हवी कपूरच्या करिअरमधील हा सर्वात मोठा चित्रपट मानला जात आहे. जान्हवी ३०० कोटी रुपयांच्या चित्रपटाची मुख्य अभिनेत्री बनण्याची ही पहिलीच वेळ आहे. एवढेच नाही, तर साऊथ सिनेमाने तिच्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्यासाठी तिला तिचे १०० टक्के योगदान द्यावे लागणार आहे. दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील चित्रपट प्रचंड नफा कमावतात. 'देवरा' हिट ठरला, तर अभिनेत्रीच्या करिअरच्या आलेखात एका मोठ्या चित्रपटाचे नाव सामील होईल.

# रेती माफियांविरोधात उपविभागीय अधिकारी ॲक्शन मोडवर; बेलखेड येथे ट्रेझर बोट पकडली

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** उमरखेड तालुक्याच्या हद्दीतील पैनगंगा नदी पात्रात महसूल विभागाच्या नाकावर टिचून अनेक वर्षांपासून अवैध रेतीचे उत्खनन होत आहे .महसूल विभागाला न जुमानताबेलखेड नदीपात्रात मागील अनेक दिवसापासून ट्रेझर बोटद्वारे रेतीचा अवैध उपसा होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून आज दि . २६ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या कार्यालयीन पथकाने बेलखेड येथे जाऊन नदीपात्रातील ट्रेझर बोट जप्त करून अज्ञात रेती माफिया विरुद्ध कार्यवाही केली आहे. सदर कारवाईमुळे तालुक्यातील इतर घाटावर ट्रेजर बोट चालविणाऱ्या रेतीमाफीयांचे धाबे दणाणले आहे.



उमरखेड तालुक्यातून वाहणाऱ्या पैनगंगा नदी पात्रातून मागील अनेक वर्षांपासून अवैधरीत्या रेतीचे उत्खनन करून शहरासह ग्रामीण भागात बांधकाम धारकांना बेभाव दराने दिवसाढवळ्या व रात्रीच्या वेळी विक्री होत असल्याच्या असंख्य तक्रारी असताना स्थानिक महसूल कर्मचारी व अधिकारी अर्थपूर्ण संबंधामुळे रेती तस्करांकडे कानाडोळा करीत असल्याने रेती तस्करांचे मनोबल दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

स्थानिक महसूल कर्मचारी व अधिकारी यांच्या सौजन्याने रेती माफियांकडून शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या गौण खनिज संपत्तीची लयलूट होत आहे.उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना बेलखेड शिवारातील नदीपात्रात ट्रेजर बोट द्वारे वाळूचा अवैध उपसा होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरून त्यांच्या कार्यालयीन पथकातील नायब तहसीलदार सुभाष पाईकराव ,दीपक चव्हाण,अक्षय बोनगुलवार ,यांनी आज दि . २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजताचे सुमारास नदीपात्र गाठून तेथे वाळू उपसा करणारी ट्रेजर बोट पकडली व पंचनामा करून ती जप्त करण्यात आली. सदर ट्रेझर बोट नेमकी कुणाची आहे याबाबत एका व्यक्तीबाबत कुजबुज सुरू असली तरी प्रत्यक्षात तेथे कोणीही व्यक्ती आढळून न आल्याने सदर बोट ही बेवारस असल्याचे कार्यवाहीमध्ये दाखविण्यात येत आहे .बेलखेड नदीपात्रात यापूर्वीही ट्रेजर बोट जप्त करून नष्ट करण्यात आली होती. त्यानंतर नपच्या एका माजी सभापती विरुद्ध पोलीस स्टेशनला गुन्हाही दाखल झाला होता.तसेच महसूल विभागाने सदर रेती माफिया विरुद्ध दंडात्मक कार्यवाही केली होती .उमरखेड तालुक्यात अनेक ठिकाणी ट्रेझर बोट द्वारे रेतीचा अवैध उपसा होत असल्याने त्यावर आळा घालण्यासाठी महसूल विभाग ॲक्शन मोडवर आला असल्याचेसदर कार्यवाही वरून दिसून येत आहे.

> शासकीय गौण खनिज संपत्ती लूट करणाऱ्यांची गय केली जाणार नाही .तालुक्यात कोणत्याही रेती घाटावर अथवा नदीपात्रातून अवैधरित्या रेतीचे उत्खनन होत असल्याची माहिती सुजाण नागरिकांनी द्यावी.
> **–सखाराम मुळे**
> **उपविभागिय महसुल अधिकारी उमरखेड**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे सोयाबीन पाण्यात

## पिक विमा मंजूर करुन कर्जमाफी द्यावी, शेतकऱ्यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** लोणार तालुक्यात बुधवारी दूपार पासून विजांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे या पावसामुळे शेतकर्यांच्या अडचणीत वाढ झाली असून पावसाने तालुक्यातील किनगाव,बिबी,भुमराळा, लोणार वझर, सुल्तानपुर,सह संपुर्ण तालुक्यात सोंगणीला आलेल्या सोयाबीन पिंकाचे प्रचंड नुकसान केले आहे हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार लोणार तालुक्यात विजांच्या कडकडाट्यासह मुसळधार पाऊस पडला

या पावसामुळे नदी नाले ओसंडून वाहत आहे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेताला तलावाचे स्वरूप आले आहे त्यामुळे अनेक ठिकाणी सोयाबीन चे पिक पाण्याखाली गेल्याचे दिसत आहे पाऊस जर असाच चालू राहिला तर सोयाबीन पिकाला चौरे येण्याची भीती शेतकऱ्यांनी वर्तवली आहे तर अनेक ठिकाणी वेचणीला आलेल्या कापसाचे देखील नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून तात्काळ पिक विमा मंजूर करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्याची मागणी लोणार तालुक्यातील शेतकरी करीत आहेत

सोयाबीनला आज रोजी साडेचार हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असून या साडेचार हजारामध्ये शेतकऱ्यांचा खर्चही फिटत नाही तर शेतकऱ्यांनी घरदार परपंच मुलांचे शिक्षण कसे करायचे हा देखील मोठा प्रश्न्न या ठिकाणी उपस्थित होत आहे त्यामुळे संबंधित विभागाने योग्य ती माहिती शासन दरबारी द्यावी आणि शासनाने पिक विमा कंपनीला आदेश द्यावेत आणि पिक विमा मंजूर करून घ्यावा तसेच कर्जमाफी करावी अशी सर्वच शेतकऱ्यांची मागणी आहे



## भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्यावर शेतकऱ्यांचा मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : आज भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्यावर शेतकऱ्यांच्या वतीने ऊसाला ३२०० रुपये भाव मिळावा यासाठी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये अनेक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या मागण्या भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याने त्वरित मान्य कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास कारखान्याचे चेअरमन आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना जाब विचारु अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे.



## परतीच्या पावसाने दाणादाण

### शेतकऱ्यांनी पिके पेरावी तरी कोणते; हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** :मागील चार-पाच दिवसापासून परतीच्या पावसाने थैमान मांडल्यामुळे सोयाबीन सह इतर खरिपाच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे आता तोंडाशी आलेला घास हिरावण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकऱ्यांनी पिके पेरावी तरी कोणते असा प्रश्न्न उपस्थित होत आहे.

मागील तीन-चार दिवसापासून परतीचा पाऊस मुसळधार कोसळत आहे सोयाबीन काढणीला आले आहे काही शेतकऱ्यांनी सोयाबीन सोंगून टाकले आहे तर अर्ध्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांचे सोयाबीन शेतातच उभे आहे दररोज पाऊस पडत असल्यामुळे पाणथळ शेतात पाणी साचून राहत असल्यामुळे उभे पिके खराब होण्याच्या मार्गावर आहेत मागील चार पाच वर्षां पासून निसर्गाचा समतोल ढळला आहे परतीचा पाऊस मुसळधार व दररोज पडत असल्यामुळे पाणथळ शेतात पाणी साचून राहत असल्यामुळे उभे पिकेही खराब होण्याच्या मार्गावर आहेत सोयाबीन हे शेतकऱ्यांचे मुख्य पीक झाले असून दरवर्षी सोयाबीन काढणीच्या वेळेला हे पीक परतीच्या पावसाच्या कचाट्यात सापडत असल्यामुळे पीकाची प्रत खराब होत आहे त्यामुळे शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसत आहे मागील तीन-चार दिवसापासून तालुका सह जिल्ह्यात मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे यावर्षी मान्सून वेळेत दाखल झाल्यामुळे व बेताचा पाऊस पडल्यामुळे सोयाबीन सह खरिपाची पिके चांगली आली होती यावर्षी तालुक्यात ५७ हजार हेक्टर वर सोयाबीनचा पेरा आहे अति पावसामुळे तुरीचे पीक जळून गेले आहे मागील तीन-चार दशकापासून सोयाबीन हे शेतकऱ्याचे मुख्य पीक झाले आहे शेतकऱ्यांची सर्व भिस्त याच पिकावर अवलंबून आहे मागील वर्षभरापासून सोयाबीनचे भाव हे निश्र्चयांक पातळीवर गेले आहेत निवडणुका असल्यामुळे यावर्षी सोयाबीनला चांगला भाव मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना होती पीकही चांगले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अशा पल्लवी झाल्या होत्या परंतु मागील तीन चार दिवसापासून परतीच्या पावसाने थैमान मांडल्यामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे अजून तीन-चार दिवस असाच पाऊस राहिला तर हे पीक हातून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे दरवर्षी ऐन काढणीच्या हंगामा सोयाबीन सह खरिपातील पिके परतीच्या पावसा च्या कचाट्यात सापडत असल्यामुळे शेतकऱ्यांनी पीके पेरावी तरी कोणते असा प्रश्न्न उपस्थित होत आहे .

## माहूर निकट च्या मालवाडा घाटातील अर्धवट कामावर नवरात्र पूर्वी तोडगा: जिल्हाधिकारी डॉ. राऊत



दैनिक आपला विदर्भ

■ राजीक शेख

**माहूर:** तीर्थक्षेत्र माहूर शहराचे प्रलंबित विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी आज दिनांक २५ रोजी खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्या सोबत माहूर चे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी जिल्हाधिकारी डॉ अभिजित राऊत यांची भेट घेतली असता माहूर निकट च्या मालवाडा घाटातील अर्धवट असलेले रस्त्याच्या कामावर नवरात्र पूर्वी तोडगा काढू व माहूर शहरातील रोहित्र अभावी बंद असलेले पथदिवे ही नावरात्रापूर्वी सुरू करण्यासाठी महामार्ग विभागाला सूचना देण्यात येईल अशी ग्वाही जिल्हाधिकारी यांनी दिली.

या वेळी लांजी चे सरपंच मारोती रेकुलवार,अमित येवतिकर यांची उपस्थिती होती.माहूर पासून दोन किमी अंतरावर असलेल्या मालवाडा घाटात मागील दोन वर्षापासून रस्ता अर्धवट स्थितीत आहे.राष्ट्रीय महामार्गाच्या या रस्त्यावर वनविभागाने दावा केल्याने हे काम थांबले आहे.विशेष म्हणजे एका बाजूने सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे काम काही प्रमाणात झाले होते,तर एका बाजूने खोदून ठेवलेला रस्ता गिट्टी व इतर बांधकाम साहित्य टाकून बंद करण्यात आला आहे.

काही दिवसात नवरात्र उत्सव येणार असल्याने परवा माहूर दौऱ्यावर खा.नागेश पाटील यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत मा.आ. प्रदीप नाईक ,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विधानसभा क्षेत्र प्रमुख ज्योतिबा खराटे यांनी मालवाडा घाटातील अर्धवट रस्त्याचा विषय खासदारांच्या लक्षात आणून दिला होता.तर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी माहूर शहरातील पथदिवे महामार्ग विभागाच्या दुर्लक्षित धोरणाना मुळे शहरात काळोख पसरल्याचे लक्षात आणून दिले होते.

तीर्थक्षेत्र माहूर शहरात उद्भवलेल्या समस्या सोडविण्यासाठी खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांना बोलावून घेत जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली.या वर जिल्हाधिकारी डॉ अभिजित राऊत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व समस्यांवर नवरात्र पूर्वी तोडगा काढण्यात येईल असा विश्र्वास जिल्हाधिकारी यांनी दिला आहे.

## ओबीसी आंदोलक मंगेश ससाणेंचे उपोषण स्थगित

**जालना/प्रतिनिधी** : ओबीसी आंदोलक मंगेश ससाणे यांनी देखील त्यांचे आमरण उपोषण स्थगित केलं आहे. आज नवव्या दिवशी ससाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे आमरण उपोषण ओबीसी समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि महिलांच्या हातून पाणी पिऊन स्थगित केले आहे. ज्येष्ठ नेत्यांच्या आदेशानुसार उपोषण स्थगित करत असल्याची माहितीही मंगेश ससाणे यांनी दिली आहे. ओबीसी आरक्षण वाचवण्याच्या मागणीसाठी ससाणे आणि त्यांचे सहकारी वडीगोद्री म्हणजेच अंतरवाली सराटीच्या फाट्यावर आमरण उपोषणाला बसले होते. जरांगेंनी अंतरवालीत पुन्हा उपोषण केल्यास आम्ही देखील पुन्हा इथेच उपोषण सुरू करू अशी प्रतिक्रिया यावेळी ओबीसीआंदोलक मंगेश ससाणे यांनी दिली आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी परिवर्तन महाशक्ती आघाडीने घेतली भेट

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : शहरांमध्ये आज परिवर्तन महाशक्तीचा मिळावा शहरातील संत एकनाथ रंग मंदिर येथे होता याप्रसंगी संभाजी राजे भोसले आमदार बच्चू कडू राजूभाऊ शेट्टीप्रमुख शंकर अण्णा धोंडगे यांची उपस्थिती मेळावा संपून सर्व प्रमुख मराठा आरक्षण युद्ध मनोज रंगे पाटील यांच्या भेटीला गेले तेव्हा संभाजीराजे भोसले यांनी मनोज जरांगे यांची विचारपूस डॉक्टरांना केली त्यावेळी डॉक्टरांनी सांगितले की त्यांच्या सततच्या उपोषणामुळे अन्न पाणी घेण्यासाठी त्रास होत आहे त्यामुळे सध्या तरी त्यांना कोणीही भेटू नये आणि जास्त बोलण्यासही सांगू नये त्यामुळे त्यांना त्रास होईल यामुळे संभाजी राजे यांनी मनोज जरांगे यांना क** शब्दात सोनाले की यानंतर आपण चार ते पाच दिवस आराम करावा कोणालाही भेटू नये आणि हे बोलताना त्यांनी सांगितले की माझा हक्क आहे त्यामुळे मी त्यांना रागवून बोललो तरी चालतं असं छत्रपती संभाजी राजे म्हणाले.

आमदार बच्चू कडू म्हणाले की सततच्या उपोषणाने त्यांची तब्येत खराब होत आहे त्यांना आता फक्त आरामाची गरज आहे तरी मी जनतेला आव्हान करतो की चार ते पाच दिवस त्यांना आराम करू द्यावा कोणीही त्रास देऊ नये सुरक्षारक्षकालाही आम्ही हेच सांगू की आत मध्ये कोणाला जाऊ देऊ नका आणि पत्रकारांनाही त्यांना बोलण्यास प्रवर्त करू नये असे बच्चू कडू म्हणाले यावेळी मनोज जरांगे यांना भेटायला परिवर्तन महाशक्तीचे प्रमुख छत्रपती संभाजी राजे, बच्चू भाऊ कडू, राजू भाऊ शेट्टी .वामन चटप शंकर अण्णा धोंडगे . व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



## संक्षिप्त...

### कल्याण पूर्वेकडील नांदीवली परिसरात धक्कादायक प्रकार; जुन्या वादातून तरुणाची हत्या



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण नांदीवली परिसरात जुन्या वाद मिटवण्यासाठी काही तरुण एकत्र आले मात्र पुन्हा त्यांच्यात वाद झाला .या वादातून एका तरुणाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली .या प्रकरणी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आला. पोलिसांनी सुजल जाधव भावेश शिंदे या दोघांना अटक केली आहे तर अयुब वर हल्ला करणारे त्यांचे दोन साथीदार दिनेश लंके ,अजित खांडे पसार झाले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. आयूब शेख हा तरुण कोळसेवाडी परिसरात राहत होता. त्याचा काही जणांबरोबर वाद होता. हा वाद मिटविण्यासाठी काल रात्री एक वाजता त्याला नांदिवली परिसरातील लक्ष्मीनगरात बोलविले होते. आयूब याच्यासोबत त्याचे मित्र अनिल वाल्मीकी आणि सूरज चटोले हे दोघेही होते. वाद मिटविण्यासठी दिनेश लंके, अजित खाडे, सुजल जाधव आणि भावेश शिंदे हे चौघे आले होते. आयूबला भावेश शिंदे आणि सुजल जाधवने बोलावले होते. याठिकाणी बोलाचाल सुरु असताना दुचाकीवरुन दिनेश लंके आणि अजित खाडे आले. त्यांनी येताच आयूबला लाथा बुक्क्यांनी जबर मारहाण करण्यास सुरुवात केली. अजितने त्याच्याकडील चोपर काढून आयूबच्या पोटावर वार केले. या हल्ल्यात आयुब चा मृत्यू झाला . आयूबच्या हत्ये प्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. दोन जण पसार झाले आहे. पोलिस त्यांचा शोध करीत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरु आहे.

### सतरंजी उचलणारे कार्यकर्ते या नेत्यांना त्यांची जागा दाखवणार- बच्चू कडू



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : शहरातील संत एकनाथ रंग मंदिरामध्ये आज परिवर्तन महाशक्तीचा मेळावा पार पडला. यावेळी आमदार बच्चू कडू म्हणाले की उद्धव ठाकरे म्हणतात, कॉंग्रेसवाले म्हणतात आम्ही तुमचे भाऊ आहोत, आम्ही म्हणतो सख्खा भाऊ आहोत आम्ही तुमच्या पाठीशी आहे. महाशक्ती म्हणजे युक्ती, भक्ती आणि शक्ती. ही सामान्य माणसाची तिरंग्याची ,युक्ती छत्रपतीची आणि भक्ती बाबासाहेब आंबेडकरांची त्याचीही महाशक्ती आहे. २००४ मध्ये स्वामीनाथन आयोग स्थापन केला कॉंग्रेसने सहा मध्ये तो स्वीकारला आणि अंमलबजावणी झालीच नाही. २००६ पासून ते २०१५ पर्यंत कॉंग्रेसच होते एक शिफारस मान्य केली नाही. मोदी आले आणि त्यांनी सांगितलं भाईयो और बहनों किसान के बी अच्छे दिन आयेंगे कसले अच्छे दिन किसानांना खड्ड्यात टाकले. दुसरा, तिसरा, चौथा, आठवा आयोग मान्य होतो तर स्वामीनाथन आयोग का मान्य होत नाही ? हा कॉंग्रेसवाल्यांना प्रश्न्न आहे, भाजपवाल्यांना प्रश्न्न आहे. तुम्ही पक्षाचे जाती-धर्माचे झेंडे घेऊन फिरा आम्ही सेवेचा झेंडा घेऊन फिरतो. तुम्ही हिरवा, निळा, पिवळा, लोकांच्या डोक्यात घाला आम्ही तिरंग्यासाठी मरणार तिरंग्यासाठी जगणार या नवीन विचाराला समोर जाऊन लढाई लढू आमदार ,खासदार, मुख्यमंत्री बनण्याची लढाई नाही ही लढाई आहे कार्यकर्ता बनण्याची लढाई आहे. पैसे न देता ही सगळे इथं जमलेले आहेत. आम्ही सर्व सतरंजी उचलणारेच आहोत ज्यांच्यासाठी टाकली होती ना त्याने सतरंजी उचलणाऱ्या कार्यकर्त्यांचे वाटोळं केलं आता हा सतरंजी उचलणारा कार्यकर्ता नेत्याचे वाटोळे केल्याशिवाय राहणार नाही असे यावेळी बच्चूकडूम्हणाले आहेत

### मेट्रो आज सुरू केली नाही तर, जेष्ठ नागरिकांच्या हस्ते उदघाटन करणार कॉंग्रेसचा इशारा




दैनिक आपला विदर्भ

**पुणे /प्रतिनिधी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज पुणे मेट्रोसह इतर विविध विकास कामांचे उद्घाटन होणार होते. मात्र पावसामुळे त्यांचा दौरा रद्द करण्यात आला. पीएम मोदींचा दौरा रद्द झाल्यामुळे, या दौऱ्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्यावरून आणि मेट्रो सुरू करण्यात यावी यासाठी कॉंग्रेस आणि मनसेकडून सरकारवर टीका करण्यात आली आहे. 'मेट्रो आज सुरू केली नाही तर, जेष्ठ नागरिकांच्या हस्ते उद्या ११ वाजता मेट्रोचे उद्घाटन करणार.', असा इशारा कॉंग्रेसनेदिलाआहे.

